POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-८३ ● मुंबई, रविवार, २६ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA




## गुजरातमध्ये राजकोटसह अनेक जिल्ह्यांना भूकंपाचे धक्के

राजकोट : गुजरातमधील राजकोट आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी दुपारी भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाचा केंद्रबिंदू सौराष्ट्रातील गोंडलपासून २४ किमी पश्चिम नैर्ऋत्येस होता. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या वृत्तानुसार भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.४ इतकी नोंदवली गेली. राजकोट आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. अनेकांनी त्यांच्या घरात भूकंपाचे धक्के जाणवल्याची माहिती दिली. भूकंपाच्या या धक्क्यामुळे जनतेत घबराट पसरली होती. सुदैवाने जीवितहानी किंवा मालमत्तेच्या नुकसानीचे कोणतेही वृत्त नाही. स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पथके सतर्क झाली आहेत. गुजरात सरकारने लोकांना शांतता राखण्याचे आणि कोणत्याही असामान्य परिस्थितीची त्वरित स्थानिक प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन केले आहे. राजकोट शहर, गोंडल, जसदान, धोराजी आणि आसपासच्या ग्रामीण भागात भूकंपाचे धक्के स्पष्टपणे जाणवले. लोक त्यांच्या घरांमधून, कार्यालयांमधून आणि आस्थापनांमधून बाहेर धावत सुटले. लोकांनी सोशल मीडियावर खुर्च्या आणि पंखे थरथरताना दाखवणारे अनेक व्हिडीओ शेअर केले आहेत. गुजरातमधील सौराष्ट्र हा प्रदेश भूकंपाच्या दृष्टीने सक्रिय झोन ३ मध्ये येतो, जेथे वेळोवेळी सौम्य भूकंप होतात. गुजरातमधील भूज येथे २००२ मध्ये झालेल्या विनाशकारी भूकंपानंतर, कच्छ आणि सौराष्ट्रमध्ये ३ ते ४ रिश्टर स्केलचे अनेक भूकंप नोंदवले गेले आहेत, परंतु कोणतेही नुकसान झालेले नाही. यापूर्वी, राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने १७ ऑक्टोबर रोजी भरूचजवळ २.६ रिश्टर स्केलची अत्यंत सौम्य भूकंपीय गतिविधी नोंदवली होती. या वर्षी गुजरात आणि आसपास १४ हून अधिक भूकंपांची नोंद झाली आहे, त्यापैकी बहुतेक भूकंप ३-४ रिश्टर स्केलचे होते.

## देशावर घोंगावतय मोठं संकट, रेड अलर्ट जारी
## महाराष्ट्राबाबत मोठी बातमी

■मुंबई । प्रतिनिधी,

यंदा पाऊस काही पाठ सोडायला तयार नाहीये, काही दिवसांपूर्वीच देशासह महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली होती, याचा मोठा फटका हा अनेक राज्यांना बसला, महाराष्ट्रातही प्रचंड नुकसान झालं. दरम्यान आता पुन्हा एकदा हवामान विभागाकडून पावसाचा इशारा देण्यात आला आहे. केरळ, तामिळूनाडूसह संपूर्ण दक्षिण भारतामध्ये पुढील तीन दिवस अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून, या पार्श्वभूमीव अनेक जिल्ह्यांसाठी पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान याचा परिणाम हा महाराष्ट्रातही जाणवणार आहे, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस पडू शकतो तर काही जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडू शकतो असा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. महाराष्ट्रात पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे.




दुसरीकडे अरबी समुद्रात वादळसदृश वातावरण निर्माण झालं आहे, तसेच ताशी 40 ते 50 किमी वेगाने वारे वाहत आहेत. मच्छिमारांनी समुद्रात मच्छिमारीसाठी जावू नये, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे. नौका आश्रयासाठी बंदरात दाखल झाल्या आहेत. दोन दिवस वादळसदृश वातावरण असल्याने मच्छिमारी व्यवसाय ठप्प झाला आहे. शेकडो नौका आश्रयासाठी देवगड बंदरात दाखल झाल्या असून, यामध्ये स्थानिक नौकांबरोबरच गुजरात, रत्नागिरी, मालवण, वेंगुर्ला येथील नौकांचा देखील समावेश आहे. पुढील तीन दिवस जिल्ह्यात वादळ सदृश्य परिस्थिती कायम राहणार आहे.

काल सायंकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सोलापूर शहरातील विविध भागांमध्ये पाणी साचल्याचं पहायला मिळत आहे. नागरी वस्तीतही काही प्रमाणात पाणी साचले होते. मात्र मध्यरात्री पावसाने उसंत दिल्याने सोलापूरकरांना काहीसा दिलासा मिळाला आहे. परंतु पुढील दोन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. सोलापूर शहरातील पूर्व भाग, अवंती नगर, वसंत विहार, जुळे सोलापूर, नई जिंदगी या भागात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला असून, पाणी साचल्याचं पहायला मिळालं.

## बदनेचे धक्कादाक कारनामे, महिलांशी घाणेरडं वागण




महिला डॉक्टरने आत्महत्या करण्यापूर्वी तिच्या हातावर एक सुसाईड नोट लिहीली होती. माझ्या मृत्यूसाठी पीएसआय गोपाल बदने हा जबाबदार आहे, त्याने ४ वेळा माझ्यावर अत्याचार केला. तसेच, प्रशांत बनकर यानेही गेल्या चार महिन्यांपासून माझा शारीरिक आणि मानसिक छळ केला असं महिला डॉक्टरने तिच्या नोटमध्ये लिहीलं होतं. याच ढरकगोपाल बदनेचे इतरही अनेक कारनामे आता उघड होऊ लागले आहेत. त्याने फक्त मृत महिला डॉक्टरलाच नव्हे तर काही इतर महिलांनाही त्रास दिला, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. पीएसआय बदने हा अनेकदा महिलांची छेड काढायचा, एवढंच नव्हे तर त्यांना डोळाही मारायचा असाही धक्कादायक खुलासा झाला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फलटण उपजिल्हा रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांनी बदाने याच्याविरोधात अनेक तक्रारी होत्या, तो महिलांची छेड काढायचा, त्यांना पाहून डोळाही मारायचा आणि तक्रार करायला गेलं तर उलट त्यांच्याकडूनच बदने पैसे मागायचा असा दावा काही महिलांनी केला आहे. एवढंच नव्हे तर एका महिलेने असाही आरोप केला की तिची भाची तक्रार करायला गेली असता, बदाने याने तिच्या नवऱ्यासमोरच तिला डोळा मारला आणि तिच्याकडे पैसे मागितले. पण तिने पैसे दिले नाहीत, ते पाहून त्याने तक्रारच नोंदवून घेतली नाही. महिलांचे हे दावे, आरोप आणि दिलेल्या साक्षी यामुळे याप्रकरणाला आणखीनच गंभीर वळण मिळालं असून बदने याच्या वागणुकीविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत.

### कोण आहे पीएसआय बदने?

महिला डॉक्टरने सुसाईड नोटमध्ये ज्या ढरकबदने वर आरोप केले तो कोण आहे ते जाणून घेऊया.

- गोपाल बदने हा गेल्या २ वर्षांपासून फलटण पोलीस ठाण्यात कार्यरत आहे.
- याआधी तो फलटण तालुक्यातील बरड पोलीस ठाण्यात कर्तव्यावर होता.
- बदने हा मूळचा बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील चांदापूर गावचा रहिवासी असल्याचे समजते.
- गोपाल बदने हा विवाहीत आहे.

### बदनेचं शेवटचं लोकेशन कुठे?

डॉक्टरच्या आत्महत्येनंतर तिच्या सुसाईड नोटमध्ये नाव असलेला ढरकबदने आणि प्रशांत बनकर हे दोघेही आरोपी फरार होते. पोलिसांनी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करत शोधासाठी पथके पाठवली. गोपाल बदने याला तत्काळ निलंबित करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. बऱ्याच शोधानंतर पोलिसांनी आज पहाटे एक आरोपी प्रशांत बनकर याला अटक केली. तो पुण्यात त्याच्या मित्राच्या फार्महाऊसवर लपला होता, पोलिसांनी तेथे जाऊन त्याला बेड्या ठोकल्या . पण पीएसआय बदने अजूनही फरार असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू असून त्याचे मोबाईलचे शेवटचे लोकेशन पंढरपूर परिसरात आढळले होते. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गोपाळ बदनेचं शेवटचं लोकेशन पंढरपूरजवळ सापडलं असून, त्यानंतर मोबाईल स्विच ऑफ करण्यात आला. त्यामुळे तो त्याच भागात नातेवाईक किंवा मित्रांकडे सुरक्षित जागी लपल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.पोलिसांकडून विविध ठिकाणी त्याचा शोध घेतला जात आहे.

## 'ऑक्टोबर हिट'मध्येच आला सावधगिरीचा इशारा



■मुंबई । प्रतिनिधी,

शुक्रवार, २४ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्राच्या बहुतांश भागांमध्ये सायंकाळी पावसानं हजेरी लावली. मुंबई शहर आणि उपनगरही इथं अपवाद ठरलं नाही. अशा या मान्सूनेत्तर पावसानं सध्या राज्यातील मुक्काम वाढवला असून, एकिकडे उष्मा वाढत असता तरीही दुसरीकडे मात्र पावसासाठी पोषक वातावरणनिर्मितीसुद्धा होताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून अरबी समुद्रात कमी दाबाच्या क्षेत्रामुळे कोकण किनारपट्टीवर पुढील ४८ तासांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. इथं वाऱ्यांच्या तीव्रता आणि दिशेत होणाऱ्या हवामान बदलांमुळे काही भागातही पावसाची शक्यता आहे. तर, २८ ऑक्टोबरपर्यंत उत्तर विदर्भ वगळता संपूर्ण महाराष्ट्रात गडगडाटासह पावसाच्या मध्यम स्वरुपातील सरींची अपेक्षा आहे. पूर्व मध्य अरबी समुद्रातातील कमी दाबाच्या पट्ट्यामुळं त्याचा थेट परिणाम कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पावसामध्ये दिसून येत आहे.

### कुठे पावसाचा अंदाज आणि यलो अलर्ट?

- २५ ऑक्टोबर : अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, जालना, बीड, लातूर, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर
- २६ ऑक्टोबर : मुंबई, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड
- २७ ऑक्टोबर : धुळे, मुंबई, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर
- २८ ऑक्टोबर : पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, रायगड, रत्नागिरी

## 'फिटला अनफिट, एमपीचा दबाव...'
## महाराष्ट्रात आत्महत्या केलेल्या महिला डॉक्टर प्रकरणात नवे खुलासे

महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यात एका महिला डॉक्टरने आत्महत्या केली आहे. मृत्यूपूर्वी डॉक्टरने आपल्या हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये दोन पोलिसांवर छळ केल्याचा गंभीर आरोप केला आहे. या घटनेची चौकशी सध्या पोलिसांकडून सुरु आहे. मात्र आता या प्रकरणात एक नवी आणि धक्कादायक माहिती समोर आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सातारा पोलिसांकडून एखादा आरोपी अटक केल्यानंतर त्याला रात्री वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात नेले जायचे. त्या वेळी जर ही डॉक्टर ड्युटीवर असायची, तर ती आरोपीला फिट असूनही अनफिट घोषित करून रुग्णालयात दाखल करायची.

माहितीनुसार, रात्री आरोपींना रुग्णालयात आणल्यामुळे डॉक्टरचा अतिरिक्त कामाचा ताण वाढायचा. त्यामुळे आपलं काम कमी करण्यासाठी ती आरोपींना फिट असूनही अनफिट घोषित करून दाखल करायची. हे प्रकरण तीन ते चार वेळा घडल्यानंतर पोलिसांनी जिल्हा मेडिकल कौन्सिलकडे तक्रार केली होती.

या तक्रारीवर मेडिकल कौन्सिलने डॉक्टरकडून स्पष्टीकरण मागितले असता, डॉक्टरने दिलेले उत्तर सर्वांनाच आश्चर्यचकित करणारे होते. डॉक्टरने सांगितले की, एका खासदाराचा फोन आला होता आणि त्याच्याकडून दबाव टाकण्यात आला होता. मात्र, त्या खासदाराचे नाव तिने उघड केले नव्हते. हे प्रकरण त्या वेळच्या घटनेपुरते मर्यादित होते आणि आत्महत्येशी थेट संबंधीत नव्हते.

दरम्यान, सातारा जिल्ह्यातील 28 वर्षीय या महिला डॉक्टरच्या संशयास्पद आत्महत्येच्या स्वतंत्र चौकशीची आणि विशेष तपास पथकाकडून तपासाची मागणी सर्वच राजकीय पक्षांकडून करण्यात आली आहे.

डॉक्टरने सुसाईड नोटमध्ये सब-इन्स्पेक्टर गोपाल बडाणे यांच्यावर वारंवार बलात्काराचा आरोप केला आहे, तसेच सॉफ्टवेअर इंजिनिअर प्रशांत बीयर याने मानसिक छळ केला, असे लिहिले आहे. या दोघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणाचा तपास सुरु आहे.




## पोलिसाकडून बलात्कार... पोस्टमार्टम रिपोर्ट बदलण्यासाठी दबाव...
## महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणातील ५ धक्कादायक खुलासे

■मुंबई । प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयात काम करणाऱ्या २८ वर्षीय महिला डॉक्टरने बलात्कारानंतर आत्महत्या केली. या प्रकरणात नवीन खुलासे समोर येत आहेत. डॉक्टरने हातावर सुसाईड नोटमध्ये मृत महिलेने गेल्या पाच महिन्यांपासून दोन पोलिसांवर बलात्कार आणि मानसिक छळाचा आरोप केला आहे.

या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सातारा पोलिसांशी चर्चा केली आणि सुसाईड नोटमध्ये नमूद केलेल्या पोलिस अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी सांगितले की, ''आम्ही गुन्हा दाखल केला आहे आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. पीडितेच्या हातात सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये केलेल्या आरोपांचीही आम्ही चौकशी करत आहोत.''

### शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी दबाव

वृत्तसंस्था पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, पीडितेच्या नातेवाईकांनी आरोप केला आहे की डॉक्टरांसह वैद्यकीय अधिकाऱ्यांवर पोस्टमार्टम अहवाल खोटा करण्यासाठी दबाव आणण्यात आला होता. पीडितेच्या चुलत भावाने सांगितले की, ''खोटा पोस्टमॉर्टम रिपोर्ट तयार करण्यासाठी तिच्यावर प्रचंड पोलिस आणि राजकीय दबाव होता. आम्ही याबद्दल तक्रार करण्याचा प्रयत्न केला. माज्या बहिणीला न्याय मिळाला पाहिजे. माझी बहीण फक्त दोन वर्षांपूर्वीच सेवेत रुजू झाली होती, परंतु अधिकाऱ्यांकडून बनावट शवविच्छेदन किंवा फिटनेस रिपोर्ट तयार करण्यासाठी तिच्यावर प्रचंड दबाव होता.''

### 'वरिष्ठांनी पीडितेला त्रास दिला'

पीडितेनं तिच्या मावशीला ती काम करत असलेल्या रुग्णालयात येणाऱ्या दबावाबद्दल सांगितलं. पीडितेच्या मावशी म्हणाल्या की, ''आम्ही तिला लहानपणापासून वाढवले आणि तिच्या शिक्षणाचा खर्च उचलला. तिच्यावर कामाचा प्रचंड दबाव होता, म्हणूनच तिने हे पाऊल उचलले. फक्त दोन दिवसांपूर्वीच तिने आम्हाला सांगितले की तिचे वरिष्ठ कामावर तिला त्रास देत होते.''

### आरोपी पोलिसाला निलंबित

साताराचे पोलिस अधीक्षक तुषार दोशी म्हणाले की, ''गोपाल बदाणे आणि प्रशांत बनकर यांच्याविरुद्ध बलात्कार आणि आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी उपनिरीक्षकाला निलंबित करण्यात आले आहे आणि पोलिस पथके दोन्ही आरोपींचा शोध घेत आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल आणि कठोर कारवाई केली जाईल.''

## ब्रेकअपनंतर मयुरेश बिल्डिंगजवळ भेट, वादावादीत सोनूचा पारा चढला
## जीव वाचवायला ती नर्सिंग होममध्ये शिरली, पण...

■मुंबई। प्रतिनिधी,

गजबजलेल्या आणि दाटीवाटीची वस्ती असलेल्या काळाचौकी परिसरात शुक्रवारी सकाळी भररस्त्यामध्ये एक थरारक घटना घडली. तरुणाने चाकूने वार केल्यानंतर जीव वाचवण्यासाठी तरुणी एका नर्सिंग होममध्ये शिरली, मात्र तिचा पाठलाग करत तरुणाने तेथेही तिच्यावर जीवघेणा हल्ला केला. यानंतर त्याने चाकूने स्वतःचा गळा चिरुन घेतला. यामध्ये दोघांचाही मृत्यू झाला असून दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेने मुंबईत खळबळ उडाली आहे.

### काय आहे प्रकरण?

काळाचौकीच्या आंबेवाडी परिसरात सोनू बराय (२४) आणि मनीषा यादव हे दोघेही वास्तव्यास होते. काही काळापूर्वी दोघांमध्ये प्रेमसंबंध होते, परंतु दहा दिवसांपूर्वीच त्यांचं ब्रेकअप झालं होतं. शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास




दत्ताराम लाड मार्गावरील मयुरेश इमारतीसमोर हे दोघे भेटले. यावेळी त्यांच्यामध्ये वाद झाला. संतापलेल्या सोनूने खिशातून चाकू काढून मनीषावर वार करण्यास सुरुवात केली.

मनीषाने त्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, मात्र सोनू ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. जीव वाचवण्यासाठी मनीषाने आरडाओरड करत जवळच्या आस्था नर्सिंग होममध्ये धाव घेतली, मात्र सोनू तिथेही तिच्या मागोमाग गेला. नर्सिंग होममध्येही त्याने मनीषावर वार केले. आजूबाजूला नागरिक जमल्याचे पाहून त्याने त्याच चाकूने स्वतःचा गळा चिरला.

भररस्त्यात घडलेल्या या घटनेची माहिती कळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सोनूला केईएम रुग्णालयात, तर मनीषाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे रुग्णालयात नेण्यात आले. सोनूला डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले, तर मनीषावर आंबेडकर रुग्णालयात प्रथमोपचार केल्यानंतर जे. जे. रुग्णालयात हलवण्यात आले. अनेक वार केल्यामुळे मनीषाच्या शरीरातून अतिरक्तस्त्राव झाल्याने उपचारादरम्यान शुक्रवारी सायंकाळी तिची प्राणज्योत मालवली.

### पोलिसांची तत्परता

एका तरुणीवर चाकूने वार केले जात असल्याची माहिती जवळच कर्तव्य बजावणारे वाहतूक पोलिस कॉन्स्टेबल किरण सूर्यवंशी यांना काही नागरिकांनी दिली. तेव्हा क्षणाचाही विलंब न करता किरण यांनी घटनास्थळी धाव घेतली. आस्था नर्सिंग होममध्ये सोनूच्या तावडीतून मनीषाची सुटका करत तिला टॅक्सीतून त्यांनी आंबेडकर रुग्णालयात नेले. या ठिकाणी तिच्यावर प्रथमोपचार करण्यात आले. यानंतर तिला जे. जे. रुग्णालयात हलवण्यात आले. किरण यांची तत्परता आणि प्रसंगावधान यामुळे मनीषाला वेळेत उपचार मिळण्यास मदत झाली, मात्र मृत्यूशी सुरू असलेली तिची झुंज अपयशी ठरली.

## विवाहित महिलेला फसवून लॉजवर नेलं
## शारीरिक अत्याचार करुन पसार

■मुंबई । प्रतिनिधी,

सोलापूर जिल्ह्यात माढा येथील हॉटेलमध्ये विवाहित महिलेला फसवून नेलं. त्यानंतर तिच्यावर जबरदस्ती शारीरिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध बलात्काराचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. उपविभागीय अधिकारी अंजना कृष्णन यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे

पोलिस उपविभागीय अधिकारी अंजना कृष्णन यांनी माढ्यातील घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे. या घटनेतील आरोपी हा फरार झाला आहे. मात्र पोलीस यंत्रणा आरोपीच्या शोधात तपास करत असल्याचे सांगण्यात येत आहे.

आरोपीने माढा येथील हॉटेलमध्ये विवाहित महिलेला फसवून नेलं. त्यानंतर तिच्याशी जबरदस्ती करुन शारीरिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी माढा पोलिस ठाण्यात पंडित वसंत गोरे (रा. अंतरगाव, ता. भूम, जि. धाराशिव) या आरोपीच्या विरोधात बलात्कारासह अत्याचार प्रतिबंधक कायद्या अन्वये गंभीर गुन्हा दाखला करण्यात आला आहे. पसार झालेल्या आरोपीचा शोध पोलिस घेत आहेत.



### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

दुसरीकडे, दिवाळीत गावाजवळ सुरु असलेल्या यात्रेत मैत्रिणीबरोबर गेलेल्या अल्पवयीन मुलीला जंगलात नेऊन युवकाने तिच्यावर अत्याचार केल्याचं समोर आलं आहे. ही घटना २२ ऑक्टोबर रोजी यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यातील गोवर्धन पांढरादेवी येथे घडली. या प्रकरणात कैलास आत्राम याला अटक झाली आहे. यात्रेत फिरत असताना काही मैत्रिणी वेगळ्या झाल्या. यावेळी चौदा वर्षीय पीडिता विहिरीजवळ मैत्रिणीची वाट पाहत बसलेली असल्याची संधी साधून आरोपी कैलास तिथे गेला आणि तिला जवळच असलेल्या जंगलात ओढत घेऊन गेला. त्या ठिकाणी तिचे तोंड दाबून त्याने अत्याचार केल्याचा आरोप आहे. पीडितेने आरोपीच्या तावडीतून कशीबशी सुटका करून घेत रस्त्याकडे धावत गेली. आरोपीही तिच्या मागे धावत गेला. रस्त्यावर मुलीसोबत एक नातेवाईक दिसल्याने आरोपी तिथून पळून गेला. रात्री उशिरा या प्रकरणाची तक्रार मारेगाव पोलिस स्टेशनला करण्यात आली आहे. मारेगाव पोलिसांनी आरोपी कैलास याच्यावर भारतीय न्याय संहिता ६४, ९६ सह पोक्सो अंतर्गत गुन्हे दाखल करून त्याला रात्रीच अटक केली आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात



**अतिवृष्टीमुळे राज्यातील सुमारे ७५ लाख हेक्टर शेतीचे प्रचंड नुकसान झाले. या संकटात राज्य सरकारने ३१,६२८ कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा करून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. बँक खात्यात थेट निधी जमा होऊ लागल्याने शेतकऱ्यांना थोडा दिलासा मिळत आहे.**

जून ते सप्टेंबर या कालावधीत राज्यात अतिवृष्टी झाली आणि ७५ लाख हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत म्हणून राज्य सरकारने तब्बल ३१ हजार ६२८ कोटींची मदत जाहीर केली. राज्य सरकारने मदतीची घोषणा केली आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला असून राज्य सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र राज्यात यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी, ढगफुटी आणि सलग पावसाच्या तडाख्यामुळे अनेक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या चारही भागांमध्ये मुसळधार पावसामुळे शेतातील सोयाबीन, कापूस, तूर, भात, ऊस, भाजीपाला आणि फळबागा या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. विशेषतः बीड, उस्मानाबाद, नांदेड, अकोला, बुलढाणा, नाशिक आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये पूर आणि पावसाच्या पाण्याने शेती उद्धवस्त झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नुकतेच एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत ३१,६२८ कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली. या निधीतून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा होत असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे. राज्यातील जवळपास १.८ कोटी हेक्टर क्षेत्रावर पिकांचे नुकसान झाले. यापैकी सुमारे ७५ लाख हेक्टर क्षेत्र पूर्णपणे उद्धवस्त झाले असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना पुन्हा शेती करणे अवघड झाले आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या मदतीमुळे शेतकऱ्यांना थोडा दिलासा मिळाला, ही शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बाब आहे. ''शेतकऱ्यांचा प्रश्न हा केवळ आर्थिक नाही, तर सामाजिक आहे.'' कोणत्याही राजकीय रंगातून न पाहता प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्याला मदत करणे राज्य सरकारची जबाबदारी आहे. मात्र विरोधी पक्षांनी या मदतीला ''निवडणूकपूर्व घोषणा'' म्हणून टीका केली आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यात मदत पोहोचण्यासाठी महिनोन्महिने विलंब होतो आणि कागदोपत्री घोषणा करून सरकारने प्रसिद्धीच्या झोतात शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर केली, अशी टीका विरोधकांनी केली. मात्र संकटसमयी शेतकऱ्यांना मदतीचा हात पुढे करणे सगळ्याच राजकीय पक्षांचे कर्तव्य आहे, हेही तितकेच खरे. महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या संकटाने ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा धक्का दिला आहे. मात्र सरकारकडून जाहीर झालेली ३१,६२८ कोटींची मदत ही शेतकऱ्यांसाठी जीवनदायिनी ठरू शकते, अशी आशा व्यक्त केली जात आहे. आता या मदतीची अंमलबजावणी जलद होत असून शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष पैसे जमा होत असल्याने महायुती सरकार शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण आहे. मात्र ही मदत अतिवृष्टीमुळे दिली असली तरी शेतकऱ्यांना कायमस्वरूपी दिलासा मिळावा यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे काळाची गरज आहे. खरीप हंगामात राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे खचलेल्या तसेच गाळाने बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी कमाल ३० हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विहिरीच्या दुरुस्तीसाठी त्वरित अर्ज करा, असे आवाहन राज्य सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ही मदत मिळावी यासाठी योग्य ती कार्यवाही करावी जेणेकरून मदतीचा हात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल, यात दुमत नाही. अतिवृष्टीमुळे बळीराजा उद्ध्वस्त झाला असून राज्य सरकारने मदतीचा हात पुढे करत दिलासा दिला आहे. मात्र कर्जांची रक्कम वसूल करण्यासाठी बँकांकडून शेतकऱ्यांना नोटीस बजावण्यात येत आहेत. त्याकडे लक्ष केंद्रित करत बँकांना समज देणे गरजेचे आहे. मदतीची घोषणा केली, मदतीचा ओघ सुरू झाला, परंतु शेतकरी पुन्हा आपल्या पायावर उभा राहील यासाठी प्रयत्न करणे काळाची गरज बनली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या नावाखाली राजकारण न करता सत्ताधारी असो वा विरोधक सगळ्यांनी एकत्र येत बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे आवश्यक आहे, तर अन् तरच शेतकऱ्यांना खरी मदत पोहोचली, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. जून ते सप्टेंबर या कालावधीत राज्यातील अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टी झाली आणि होत्याचे नव्हते झाले. शेतकऱ्यांचे संसार उद्धवस्त झाले. राज्य सरकारने आर्थिक मदतीची घोषणा केली. राज्य सरकारने ज्या तत्परतेने मदतीचा हात पुढे केला, त्याप्रमाणे केंद्र सरकारने मदतीची घोषणा केली असती, तर शेतकऱ्यांना आणखी दिलासा मिळाला असता यात दुमत नाही. गेल्या काही वर्षांत राजकारणाचा पॅटर्न बदलला असून जनतेच्या समस्या सोडवण्याऐवजी लोकप्रतिनिधी आपलाच तोरा मिरवत असल्याचे वेळोवेळी समोर आले आहे. अवकाळी पाऊस, कर्जास नकार यामुळे जगाचा पोशिंदा बळीराजा हवालदिल झाला आहे. शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. बळीराजा टिकला तर तुम्ही-आम्ही जगू. शेतीसाठी अद्ययावत तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणार अशी घोषणा राज्य सरकारकडून करण्यात येते. परंतु नुसती घोषणा न करता शेती व्यवसाय अधिक सक्षम कशा प्रकारे होईल याकडे राज्य सरकारने लक्ष केंद्रित केले पाहिजे, हेही तितकेच खरे.

# आश्वासनांच्या ढिगाऱ्याखाली गाडलेला राज्यातील अन्नदाता



महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या हा विषय दशकानुदशके चालत आलेला आहे. विदर्भ आणि मराठवाडा हे दोन भाग तर आत्महत्यांचे केंद्र बनले आहेत. येथे शेतकरी एका हंगामाच्या पिकावर जगतो, ते पीक जरी नासले तरी त्याचे जीवन उद्धवस्त होते. सध्या महायुती सरकारच्या काळात ही शोकांतिका अधिक तीव्र होत चालली आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी नुकतीच समाजमाध्यमांवरून सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी स्पष्ट शब्दात म्हटले की, महायुती सरकारने शेतर्कयांना कर्जमाफीचे गोडवे गायले, त्यांच्या भोळ्या-भाबड्या विश्वासाचा गैरफायदा घेतला आणि निवडणुकीत मते मिळवली, पण प्रत्यक्ष सत्तेत आल्यावर हे वचन पूर्ण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले. याचा थेट परिणाम म्हणजे केवळ आठ महिन्यांत तब्बल १ हजार १८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यात पश्चिम विदर्भातील ७०७ आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील ५२० शेतकरी आहेत. वडेट्टीवार यांच्या दाव्याचा विचार करता, महाराष्ट्रात दररोज सुमारे पाच शेतकरी आत्महत्या करतात.

शेतकरी आत्महत्यांच्या मागील मूळ कारणे अनेक आहेत. शेती हा व्यवसाय आजही पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर आणि प्रमाणात पडला तर शेतकऱ्याला थोडा दिलासा मिळतो, पण पावसाचा नादुरुस्त पॅटर्न शेतकऱ्याचे जीवन उद्ध्वस्त करतो. एका बाजूला अतिवृष्टी तर दुसऱ्या बाजूला पावसाची टंचाई, गारपीट, वादळ अशा नैसर्गिक आपत्तींचा शेतकऱ्याला सामना करावा लागतो. यामुळे पिकांचे नुकसान होते आणि उत्पन्नावर पाणी फिरते. याच वेळी उत्पादन खर्च वाढतो. बियाणे, खते, कीटकनाशके, डिझेल, मजुरी या सर्व गोष्टींच्या किमती सातत्याने वाढत आहेत. पण बाजारात मिळणारा भाव तसाच स्थिर किंवा अनेकदा किमान हमीभावापेक्षा कमी असतो. अशा परिस्थितीत शेतकरी कर्ज घेतो, तेही अनेकदा बँक आणि खासगी सावकार या दोन्हीकडून. बँकांचे कर्ज न मिळाल्यास सावकारांच्या दरवाजावर धाव घ्यावी लागते आणि तेथे व्याजाचा दर इतका जास्त असतो की कर्जाचा डोंगर वाढत जातो. या सगळ्या आर्थिक घुसमटीबरोबर सामाजिक दबावही शेतकऱ्याला पेलावा लागतो. कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे शिक्षण, विवाह, वैद्यकीय खर्च हे सर्व हातातल्या पैशाशिवाय भागवणे अशक्य होते. गावोगावी प्रतिष्ठेचे राजकारण आहे. शेतकरी आपल्या मुलांना, पत्नीला, घराला जगवण्यासाठी कर्ज घेतो, पण पिके निघाली नाहीत की तो समाजात तोंड दाखवण्यासही लाजतो. अशा परिस्थितीत आत्महत्या हा एकमेव मार्ग शिल्लक राहतो. राजकारण या शोकांतिकेत महत्त्वाची भूमिका बजावते. निवडणुकीत प्रत्येक पक्ष शेतर्कयांचे गोडवे गातो. महायुती सरकारनेही त्याला अपवाद केला नाही. त्यांनी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले.

शेतकऱ्यांनी या वचनावर विश्वास ठेवला आणि मोठ्या संख्येने महायुतीला मते दिली. परंतु सत्तेत आल्यावर महायुतीने तोंड फिरवले. शासनाच्या मते, संपूर्ण कर्जमाफी देणे शक्य नाही, फक्त अत्यंत अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत केली जाईल. त्यासाठी समिती नेमण्यात आली, ज्याचा अहवाल अद्याप आलेला नाही. ही भूमिका म्हणजे सरळसरळ फसवणूक आहे. शेतकरी या आश्वासनाच्या भरवशावर बँकेकडे कर्जाची परतफेड पुढे ढकलत होते. आता जेव्हा सरकारने कर्जमाफी नाकारली, तेव्हा त्यांच्यावर परतफेडीचा डोंगर कोसळला. बँका आणि सावकारांच्या दडपणाखाली ते आत्महत्या करत आहेत. महायुती सरकारने दिलेली इतर आश्वासनेही तशीच धूळ खात पडली आहेत. मृत शेतर्कयांच्या कुटुंबांना तात्काळ मदत मिळेल असे सांगितले गेले, पण प्रत्यक्षात मदत मिळण्याआधी कुटुंबांना शेकडो कागदपत्रे जमा करावी लागतात. पात्रता निकष इतके कठोर ठेवले आहेत की अनेक कुटुंबे मदतीपासून वंचित राहतात. 'लाडकी बहीण' योजनेतून महिलांना मासिक आर्थिक मदत मिळेल असे सांगण्यात आले होते, पण निधीअभावी त्यात अडथळे निर्माण झाले. सिंचन प्रकल्प राबवले जातील, पाण्याचे योग्य नियोजन होईल असेही आश्वासन दिले गेले होते, पण प्रत्यक्षात कोणताही ठोस बदल झाला नाही. शेतर्कयांची सर्वात मोठी मागणी असलेली किमान आधारभूत किंमतीवर कायदेशीर हमी याबाबतही कोणतीही पावले उचलली गेली नाहीत.

थोडक्यात, सरकारला शेतकऱ्यांच्या जीवनमरणाशी काहीही देणेघेणे नाही. निवडणुकीत मते मिळवून सत्ता मिळाल्यावर त्यांना शेतकऱ्यांच्या व्यथा विसरायला वेळ लागत नाही. आत्महत्यांचा आकडा हे सरकारच्या अपयशाचे मोठे प्रमाणपत्र आहे. आज शेतकऱ्यांसाठी मानसिक आरोग्य सल्ला केंद्रे, समुपदेशन सुविधा, आधार गट यांची गरज आहे. परंतु याकडे कोणी लक्ष देत नाही. सरकारला शेतकरी हा फक्त निवडणूक जिंकण्याचे साधन वाटतो. या सर्व परिस्थितीत उपाययोजना दोन प्रकारच्या असायला हव्यात. तात्काळ आणि दीर्घकालीन. तात्काळ उपाययोजनांत त्वरित कर्जमाफी, नुकसानभरपाई वेळेवर मिळणे, विमा दावे तातडीने मंजूर होणे, मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबांना अडथळ्यांशिवाय मदत मिळणे यांचा समावेश होतो. दीर्घकालीन उपाययोजनांत सिंचन व्यवस्थेचा विकास, पावसावर अवलंबून असलेल्या भागांना स्थायी जलस्त्रोत उपलब्ध करून देणे, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी अनुदान देणे, पिकांच्या किमतीत स्थिरता आणण्यासाठी किमान हमीभावावर काटेकोर अंमलबजावणी, शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची बाजारपेठ उपलब्ध करून देणे यांचा विचार करावा लागेल.

# गुंडांवर पोलिसांची जरब हवी



नव्वदच्या दशकात मुंबई आणि ठाण्यात गुन्हेगारी टोळ्यांनी उच्छाद मांडला होता. ठाण्यात मंचेकर, मुंबईत छोटा राजन, दाऊद, अरुण गवळी, अमर नाईक या टोळ्यांमध्ये रस्त्यांवर रक्तपात वाढला असताना पोलिसांनी गुन्हेगारी कारवाया संपवण्यासाठी मुंबईत प्रदीप शर्मा, दया नायक, विजय साळसकर तर ठाण्यात रवींद्र आंग्रे अशी नव्या दमाच्या अधिकारी तरुणांची फौज मैदानात उतरवली होती. त्यातून गुन्हेगारांना त्यांच्याच भाषेत उत्तर मिळू लागल्याने गँगवॉर संपुष्टात आले. सुरेश मंचेकर, फिरोज कोकणी यांच्या गुन्हेगारी कारवायांना ठाणे पोलिसांचे रवींद्र आंग्रे कर्दनकाळ ठरले होते. तत्कालीन राज्य सरकार पोलिसांच्या पाठीशी राहिल्याने मुंबईतून टोळीयुद्ध संपवण्यात पोलीस आणि गृहविभागाला यश आले.

मुंबईतील १९९२-९३ च्या सांप्रदायिक दंगलीनंतर मुंबईत साखळी बॉम्बस्फोटांसाठी पार्श्वभूमी तयार झाली होती. गुन्हेगारी टोळ्यांच्या वेळीच मुसक्या आवळल्या न गेल्याने १२ मार्च १९९३ मध्ये पुढे मुंबईतील बॉम्बस्फोटासाठी पूरक स्थिती तयार झाली. गुन्हेगारी रक्तपात सामान्यांच्या घरापर्यंत येऊन पोहचल्याने पोलिसांनी त्यानंतर मुंबईतून गुन्हेगारीचा बिमोड करण्याचे ठरवले. आज महाराष्ट्रात विशेष करून बीड, सोलापूर, ठाणे, पुण्यात रक्तरंजीत सूडाने पेटलेल्या गुन्हेगारी टोळ्यांनी डोकी वर काढली आहेत. या गुन्हेगारी टोळ्यांना राजकीय वरदहस्त मिळत असल्याच्या आरोपात तथ्य असावे, अन्यथा या कारवाया एवढ्या मोठ्या कालावधीत सातत्याने सुरू राहिल्या नसत्या.

आयुष कोमकरच्या हत्येनंतर पुण्यात आंदेकर विरुद्ध कोमकर टोळीयुद्धाचा भडका उडण्याची शक्यता आहे. मागील काही राजकीय घडामोडींमध्ये पोलिसांवरील तणाव प्रचंड वाढला आहे. केवळ राजकीय वापरासाठीच आणि राजकीय नेत्यांच्या सुरक्षेसाठीच पोलिसांचा उपयोग होत आहे का, असा प्रश्न सामान्यांना पडत आहे. राजकीय आंदोलने आणि धार्मिक, जातीय ताणतणावाच्या बंदोबस्तातच अर्धेअधिक पोलीस बळ खर्ची पडत आहे. अशा परिस्थितीत पोलीस दलाच्या कारवायांमध्ये राजकीय ढवळाढवळ होत असल्याने पोलिसांचे मनोधैर्य कमी होत आहे. अशा परिस्थितीत एकीकडे राजकीय दबाव आणि दुसरीकडे कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी अशा दोन जबाबदाऱ्यांमध्ये पोलिसांना त्यांचे मानसिक शारीरिक आरोग्य संतुलन ठेवावे लागत आहे.

या बंदोबस्त आणि सरकारी सोपस्कारातच पोलीस दलाचा अर्धाअधिक वेळ जात असल्याने पोलिसांचे पुरेसे भय गुन्हेगारांना राहिलेले नाही. वसई रेल्वे स्टेशनवर एका व्यक्तीने पोलिसांवर केलेली अरेरावीचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. पोलिसांना थेट आव्हानाची भाषा समाजमाध्यमांवर गुन्हेगारांकडून केली जात आहे. अशावेळी कारवायांसाठी पुरेशी मोकळीक पोलिसांना देण्याची गरज आहे. या गुन्हेगारी टोळ्यांना मिळणारी राजकीय रसद, अंमलीपदार्थ व्यवहार, जमिनव्यवहार, खंडणीवसुली आणि बेकायदा कामांतून येणारा पैसा रोखण्याची गरज आहे. भूमाफीयांशी असलेले गुन्हेगारांचे राजकीय लागेबांधे नवीन नाहीत, त्यातून येणारा पैसा आणि राजकीय आशीवादार्मुळे गुन्हेगारी टोळ्यांचा उच्छाद ठाणे, पुण्यात वाढला आहे.

पुण्यामध्ये मागील २० वर्षात अमली पदार्थांशी संबंधित गुन्हेगारी घडामोडींना उत आला आहे. बीडमधील गुन्हेगारी कारवायांनी रोजच्या रोज वर्तमानपत्रांचे रकाने आणि वृत्तवाहिन्यांचा प्राईम टाईम भरून निघत आहे. ठाण्यातील उल्हासनगर, अंबरनाथमध्ये गुन्हेगारी टोळ्यांकडून वाहनांना आगी लावणे, हत्यारे घेऊन रस्त्यात दहशत माजवण्याचे प्रकार वाढले आहेत. तिकडे विदर्भ नागपूरमध्ये बेकायदा व्यवसाय आणि जमीन व्यवसायांशी संबंधित गुन्हेगारी कारवाया वाढल्या आहेत. महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्ह्यांमध्ये छोट्यामोठ्या टोळ्या सक्रीय झाल्या आहेत. सोलापूरमध्ये अनमोल केवटे यांची रस्त्यातच शनिवारी हत्या झाली. पुण्यातील नाना पेठेत झालेल्या टोळीयुद्धात १९ वर्षीय आयुष कोमकरची निर्दयपणे हत्या करण्यात आली होती.

माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी आंदेकर टोळीने आयुषवर गोळीबार केला. तब्बल १२ गोळ्या झाडल्या, पैकी नऊ गोळ्या आयुषला लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. आयुष हा वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपी गणेश कोमकर यांचा मुलगा असल्याने टोळीने सूड उगवला होता. ही घटना थंड होत नाही तोच पुण्यात किरकोळ कारणाने गोळीबाराची घटना नुकतीच घडली. मध्यरात्री कोथरूड परिसरात हा गोळीबार झाला. कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्या चार जणांच्या टोळीकडून गाडीला पुढे जाण्यासाठी साईड न दिल्याने या किरकोळ कारणाने हा गोळीबार झाल्याची माहिती आहे.

यात एकजण जबर जखमी झाला आहे, सामान्य नागरिकांवर गोळ्या चालवण्यासाठी या गुन्हेगारी टोळ्यांपर्यंत घातक पिस्तुले, अग्निशस्त्रे कशी येतात हा प्रश्न आहे. तर गुन्हेगारीने आधीच बदनाम झालेल्या बीडच्या अंबोजोगाई भागात जुन्या प्रकरणातून एका व्यार्पायावर लोखंडी कत्तीने वार केल्याची घटना घडली आहे. यावेळी दोन हल्लेखोरांनी या व्यापाऱ्याला 'तुझा मुळशी पॅटर्न' करतो अशी धमकी देऊन लोखंडी कत्तीने वार केला, वेळीच बचाव केल्याने हा व्यापारी वाचला. गोळीबारानंतर कोथरुडमध्ये पोलिसांनी गुंडांची धिंड काढली आहे. अशीच जरब इतर गुन्हेगारांना बसवण्याची गरज आहे. एखादा गुंड तरुंगातून सुटल्यावर त्याचा सत्कार करून मिरवणूक काढण्याच्या प्रकारांना आळा घालायला हवा. पोलिसांची धास्ती गुंडांना बसणे गरजेचे आहे, नाही तर सामन्य माणसांचे जगणे अवघड होऊन बसेल.

# प्रकाशाकडून अंधाराकडे



सध्या राज्यातील शहरी भागात दिवाळीचा उत्साह आहे तर ग्रामीण भागात खासकरून मराठवाडा, बुलढाणा, जळगाव, परभणी आदी जिल्ह्यांच्या ग्रामीण भागात पावसामुळे केवळ सण आहे म्हणून दिवाळीचा दिवस पुढे ढकलला जात आहे. राज्यात अशी परिस्थिती असताना तीन महत्त्वाच्या घडामोडींनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. यामुळे आपण प्रकाशाकडून अंधाराकडे प्रवास करत आहोत का, अशी शंका येते. यातील पहिली घडामोड शनिवारवाड्यातील आहे. भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी शनिवारवाड्यात नमाज अदा करर्णाया महिलांचा व्हिडीओ व्हायरल करून वादाला तोंड फोडले. त्यावेळी त्यांच्यासोबत हिंदुत्ववादी संघटना होत्या. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी या वादात उडी घेत मेधा कुलकर्णी यांना लक्ष्य केले. हे कमी म्हणून की काय शिवसेनेच्या डॉ. नीलम गोंहे यांनी मेधा कुलकर्णी यांच्यावर टीका केली.

मुळात जर शनिवारवाड्यात नमाज अदा होत असेल तर तो नेहमी केला जातो की त्याच दिवशी केले हे स्पष्ट व्हायला हवे. मात्र, व्हिडीओ व्हायरल करत वादाला फोडणी देत समाजात सनसनाटी निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. खासदार मेधा कुलकर्णी यांनी धार्मिक वाद उत्पन्न न करता याची रितसर तक्रार करून थांबायला हवे होते. कारण राज्यात आणि केंद्रात हिंदुत्ववाद्यांचे सरकार आहे. व्हिडीओ व्हायरल करत माध्यमांना बोलावून आणि जाहीर वक्तव्य करण्याचे कारण नव्हते. हा विषय अचानक समोर आणून हिंदू-मुस्लीम वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याची बाब प्रकषार्ने समोर आली आहे.

दुसरी घटना नागपूरमधील आहे. महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. मात्र, भूमिपूजनाला पुजारी बोलावून वेदमंत्रांचा उच्चार करण्यात आला. यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाला महत्त्व देत धार्मिक रुढी आणि कर्मकांडांना कायम विरोध केला होता. मात्र, त्यांच्याच नावाने सुरू केलेल्या संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीचे भूमिपूजन करताना वेदमंत्रांना महत्त्व दिल्याने सामाजिक संघटना त्यातही फुले दाम्पत्याच्या कायालर्ा अनुसरणारे कार्यकर्ते प्रचंड नाराज झाले आहेत. जे विचार जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मांडले, रुजवले त्यांना फाटा देण्याचा प्रकार सरकारने केल्यामुळे ही नाराजी आहे. अशा घटना का घडतात? त्या घडतात की घडवल्या जातात? या वैचारिक अधःपतनाला जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले आहेत.

महात्मा जोतिबा फुले यांनी ह्यनकोच मध्यस्थी देव आणि भक्तांमध्येह्ल असे कायम सांगितले. मात्र, त्यांच्या नावाने ह्यमहाज्योतीह्लच्या इमारतीचे भूमिपूजन करताना जे फुले यांना अपेक्षित नव्हते तेच सरकारने केले आहे. महात्मा फुले यांच्या विचारांनाच पायदळी तुडवल्याचे भूमिपूजनाच्या कार्यक्रमात दिसून आले. याला सरकारची वैचारिक दिवाळखोरी म्हणावी का? महाज्योतीच्या व्यवस्थापकीय संचालकांना याची जाणीव असायला होती. किंबहुना, त्यांनीच अशा कार्यक्रमाला संमती नाकारणे अपेक्षित होते. कारण ज्या महात्मा फुले यांचे नाव दिले आहे त्यांचे कार्य त्यांना माहीत असावे, अशी अपेक्षा आहे. कदाचित राजकीय दबावापुढे त्यांचेही काही चालले नसेल.

आता तिसरी घटना आहे दिवाळीतील आतषबाजीची! आवाजाचे आणि धूर सोडर्णाया फटाक्यांमुळे ध्वनी आणि वायू प्रदूषण होते, यात नवीन काहीच नाही. एवढे प्रदूषण होत असून आणि याचा थेट परिणाम सर्वांच्याच आरोग्यावर होत असतानाही कुठलीही वेळेची मयार्दा न पाळता मोठ्या आवाजाचे फटाके वाजवले जात आहेत आणि त्यावर पोलीस कोणतीही कारवाई करताना दिसत नाहीत. दिवाळीत फटाके वाजवायला विरोध नाही मात्र, आवाजाचे फटाके तसेच धूर करणारे फटाके टाळल्यास खूप फरक पडू शकेल. तसेच रात्री 10 वाजल्यानंतर फटाके फोडू नयेत, असा नियम असला तरी हा नियम कुणी पाळत नाही. मध्यरात्रीनंतरही फटाके फोडले जातात. याकडे सर्वांनी गांभीयार्ने पाहायला हवे. मात्र, याकडे लक्ष वेधले तर हिंदू सणांनाच विरोध का, असा आक्षेप घेतला जातो.

वास्तविक हा सर्वांच्याच आरोग्याचा प्रश्न असून याला धार्मिक रंग देण्याची गरज नाही. उशिरापर्यंत फटाके वाजवर्णायांवर पोलिसांकडून कारवाई का केली जात नाही? असाही सवाल उपस्थित होतो. दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा उत्सव आहे. प्रत्यक्षात आनंद घेण्यापेक्षा कानठळ्या बसवणारे फटाके फोडून आनंदावर विरजण टाकण्याचे काम केले जाते. आपल्याकडून नियमाचा भंग होतो आहे, ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषणात भर घातली जात आहे, याची जाणीव ना फटाके फोडर्णायांना आहे ना त्यांच्या पालकांना! त्यामुळे नियम असले तरी यावर कुणाचाही अंकुश नाही, हे वास्तव आहे. दिवाळी सुरू झाल्यापासून हवेचा दर्जा खालावला आहे, ही खूप गंभीर बाब आहे. ज्यांना दमा (अस्थमा) आणि श्वसनाचे असे आजार आहेत, रुग्णशय्येवर असतात त्यांना या आवाजाचा आणि धुराचा प्रचंड त्रास होतो. आजारांना कुठलाही धर्म, पंथ, जात नसते. त्यामुळे आता 21 व्या शतकात भारताची आर्थिक घौडदौड सुरू असताना आणि 5 ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेची स्वप्ने बघर्णाया भारताला आज प्रकाशाकडे वाटचाल करण्याची गरज आहे. मात्र, सध्याची दिशा पाहिली तर आपण प्रकाशाकडून अंधाराकडे तर जात नाही ना, अशी शंकेची पाल चुकचुकते.

# गरम पाण्यानं आंघोळ केल्याचे हे ४ फायदे



आंघोळीसाठी गरम पाणी वापरावं की थंड?, हे वादाचे मुद्दे आहेत. मात्र आंघोळ गरम पाण्यानं केल्याचे फायदे आणि थंड पाण्यानं केल्याचे फायदे हे भिन्न आहेत, चला तर पाहू गरम पाण्यानं आंघोळ केल्याचं फायदे..

लॉकडाऊनमुळे मुंबईच्या प्रदूषणात ८०% टक्के घट

**थकावा दूर होतो..**

गरम पाण्यानं आंघोळ केल्यानंतर थकवा, क्षीण क्षणात दूर होते. त्यामुळे थकावा दूर करायचा असल्यास गरम पाण्यानं आंघोळ करा. आंघोळ करण्यापूर्वी थोड्या गरम पाण्यात पाच मिनिटे पाय टाकून रिलॅक्स व्हा, यानं खूपच आराम पडतो.

**झोप चांगली लागते**

गरम पाण्यानं झोपण्यापूर्वी आंघोळ केल्यानं झोप चांगली लागते. त्यामुळे झोप येत नसेल तर गरम पाण्यानं आंघोळ करावी.

**त्वचेसाठी योग्य**

गरम पाण्यानं आंघोळ ही त्वचेसाठीदेखील फायदेशीर आहे. यामुळे त्वचेमधला ओलावा टिकून राहतो, तसेच त्वचा रुक्ष होण्यापासून वाचते.

**त्वचा अधिक स्वच्छ होते**


संशोधनानुसार गरम पाण्यानं आंघोळ केल्यानं त्वचेवरी बारीक छिद्रे खुली होतात. यात अनेकदा डर्ट जमा होते, ही छिद्र खुली झाल्यानं त्वचा अधिक स्वच्छ होते.

# अगदी आठवडाभरात असे कमी करा मांडी आणि नितंबावरील फॅट

हल्ली अनेक जण फिगरबाबत फारच जागरुक झाले आहेत. जीम, योगा, पिलाटेस असे सगळे काम सांभाळून करण्याचा सपाटा अनेकांनी लावला आहे. आता प्रत्येकाच्या परफेक्ट बॉडीची defination ही वेगळी असते. म्हणजे काहींना त्यांचे ठराविक भागच कमी करायचे असतात. म्हणजे काहींना त्यांचे दंड बाहुबलीप्रमाणे बलदंड वाटतात. ते कमी करण्यासाठी त्यांची धडपड सुरु असते. काहींना पोट, काहींना कंबर, फेसफॅट, थाईज, नितंब.. असं बरचं काही कमी करायचं असतं. शरीवरील फॅट कमी करत असताना सगळ्यात जास्त त्रासदायक ठरतात ते मांडी आणि नितंबावरील फॅट. तुमच्याही मांड्या आणि नितंबाचा आकार शरीराच्या तुलनेत अधिक आहे तर मग तुम्ही या सोप्या टीप्सने आठवडाभरात तुमचे फॅट कमी करु शकता.











**स्कॉट्स**

तुम्हाला पहिल्यांदा स्कॉट्स हा व्यायाम करायचा आहे. तुम्हाला गुडघे समांतर ठेवून खाली बसायचे आहे. खूर्चीवर बसतात तसे तुम्हाला बसायचे आहे. पण हे करताना तुमचा गुडघा तुमच्या पायाच्या पुढे जायला नको. असे करताना तुमच्या मांड्या आणि नितंबावर ताण येईल. साधारण १० पासून तुम्ही स्कॉट्स करायला सुरुवात करा. स्कॉटस करताना तुम्हाला थोडा पाय दुखल्यासारखे वाटेल. पण तुम्हाला किमान १० वेळा तरी असे करायचे आहे. त्यानंतर तुम्ही यामध्ये वाढ करायला काहीच हरकत नाही.

**जम्पिंग जॅक्स**

दोन्ही हातांची टाळी देऊन आणि दोन्ही पाय लांब करुन तुम्हाला हा व्यायाम करायचा असतो. तुम्ही ही क्रिया वारंवार करायची आहे. किमान १० उड्यांपासून तुम्ही याची सुरुवात करा. नंतर तुम्ही उड्या वाढवू शकता. हे केल्यावर तुम्हाला थोडा थकवा येईल.

**हाय हिल्स**

पाय जितके वर उंचावता येईल तितके उंचावून तुम्हाला हा व्यायाम प्रकार करायचा आहे. असे करताना तुम्हाला तुमच्या मांड्यांचाव वरील भाग दुखेल असा वाटेल. पण ठिक आहे किमान ३० सेकंद तर तुम्ही हे करायला हवे. तरच याचा फायदा तुम्हाला होईल.

**बट ब्रीज**

पाठीवर झोपून तुम्हाला तुमचे नितंब वर उचलायचे आहेत. अगदी सेकंभरासाठी तुम्हाला तुमचे शरीर उचलून धरायचे आहे. असे तुम्हाला करायचे आहे. हे करत असताना तुम्हाला तुमच्या नितंबावर थोडा ताण जाणवेल. त्याचा फायदा तुम्हाला तुमचे नितंबावरील फॅट कमी करण्यास मदत करेल.

**सीझर्स**

पाय हवेत वर करुन तुम्हाला कात्री प्रमाणे त्याची हालचाल करायची आहे. जर तुम्ही काऊंटीगवर ते करणार असाल तर किमान २० वेळा तरी असे करा आणि जर तुम्ही घड्याळ लावून करणार असाल तर किमान ३० सेकंद तरी करा. तुमच्या इनर थायमधील फॅट कमी होण्यास मदत होईल.

**आठवडाभराच्या चॅलेंजसाठी व्हा सज्ज**

आता तुम्हाला काही तरी कमी करायचे आहे. म्हणजे तुम्हाला काही नियमांचे पालन नक्कीच करावे लागेल. सात दिवस तुमच्या शरीरात जास्तीत जास्त फळ जाऊ द्या. कमीत कमी साखर आणि गोड पदार्थ ठेवा. जर तुम्हाला डाएट करणे शक्य नसेल तरी ठिक आहे.तुम्ही तुमचा आहार चौकस ठेवा. वेळेवर नाश्ता आणि जेवण असू दया. रात्री खूप उशीरा जेवू नका.

# मुलाने हे खायलाच हवं हा हट्ट वाढवू शकतो तुमच्या मुलांमधील लठ्ठपणा

आपल्या मुलाने निरोगी राहावं असं प्रत्येक आईला वाटतं. मुलं निरोगी राहण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करते. त्याच्या आहारात पौष्टिकच गोष्टींचा समावेश करते. मुलांनी बाहेरचं न खाता घरात तयार केलेलं अन्न खावं यासाठी ती तळमळीने चांगले चांगले पदार्थ शिकते. मुलांना खाऊ घालते. पण तुमची हीच पौष्टिक आणि सतत चांगलं खाण्याची सवय तुमच्या मुलांच्या आरोग्यासाठी घातक आहे ती कशी ते आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. त्यासाठी पुढे नक्की वाचा.



**सतत खायला देत राहणे**

आईचं मन फारच काळजीवाहू असतं. तिला आपल्याला मुलाने सतत खात राहावे असे वाटते. म्हणजे ती आल्यावरही विचारते तुला भूक लागली का? तुला काहीतरी खायला करुन देते. मग ही दिवसभरातील कोणतीही वेळ असो तिला तिच्या मुलाने सतत खावेसे असे वाटते. तुम्ही देखील आजुबाजूला अशी अनेक उदाहरणे पाहिली असतील ज्या ठिकाणी आई आपल्या मुलांना अगदी रात्रीही घरी परतल्यानंतर खाऊ घालतात. आता तुम्ही म्हणाल यात काय चुकलं? तर तुमच्या मुलांना आवश्यक असलेल्या गोष्टी तुम्ही त्यांना देणे चांगले पण त्यांना खायला देताना तुम्ही वेळ आणि काय खायला देत आहात हे देखील बघा. कारण बरेचदा आई आपल्या मुलाचे पोट भरावे म्हणून त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक खायला देतात.

**तुला हे खायलाच हवं**


आई आपल्या मुलांना चांगल ओळखते हे आम्हाला माहीत आहे. पण त्यांच्यावर खाण्याची जबरदस्ती करणेही चांगले नाही. तुमचं मुलं काल भरपूर जेवलं असेल म्हणून ते उद्या तितकचं जेवेल असं होत नाही. पण काही पालक मुलांच्या पानात अन्न वाढतात. त्यांना कधी कधी ते खाता येत नाही. अशावेळी काही पालक मुलांना जबरदस्ती करुन पानातील अन्न संपवायला लावतात. मुलं रडत असली तरी तुज्यासाठी हे आवश्यक आहे.तू हे खायलाचं हवे. असे सांगून आई इमोशनल ब्लॅकमेल करुन मुलांना खाऊ घालतात. पण हीच पालकांची चुकी आहे. वाढीच्या वयातील मुलांनी योग्य आहारा घ्यावा ही गोष्ट योग्य असली तरी खाण्याची जबरदस्ती तुम्हालाच पुढे त्रासदायक पडू शकते. गरजेपेक्षा जास्त जेवण जेवल्यामुळे मुलांना अपचनाचा त्रास होऊ शकतो किंवा त्यांचे वजनही वाढू शकते.

**सतत पौष्टिक पदार्थ देत राहणे**

आता काही आई अशा असतात ज्यांना आपल्या मुलांना कायमच पौष्टिक द्यायचे असते. अगदी सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत त्यांनी काय पौष्टिक खायला हवे याचे एक वेळापत्रकच त्यांनी तयार केलेल असते. त्यांच्या या वेळापत्रकानुसार मुलांनी ते खावे असेच त्यांना वाटते. काही पालक पौष्टिक लाडू बनवतात. यामध्ये वेगवेगळी पीठ, ड्रायफ्रुट असतात.या सगळ्याचे किती प्रमाण मुलांच्या आहारात असावे हे त्यांना कळत नाही. त्यांना असे वाटते की, इतके पौष्टिक घटक पोटात गेल्यानंतर मुलाचे आरोग्य चांगले राहील.पण असे होत नाही. तुमच्या या सतत खाण्याच्या वेळापत्रकामुळे मुलांमध्ये लठ्ठपणा वाढतो. शिवाय त्यांना अन्य आजार होण्याची शक्यता असते.

मुलांना सगळ्यात जास्त आई ओळखते ही गोष्ट खरी असली तरी सुद्धा कधी कधी महिला भावनेच्या भरात आपला मुलगा काहीच खात नाही म्हणून त्याला खाऊ घालतात. तुम्हाला तुमचे मुलं कुपोषित आहे असे वाटत असेल तर डॉक्टरांकडे न्या. त्यांच्या उंचीनुसार त्यांचे वजन किती असायला हवे हे विचारुन घ्या. ती यादी जवळ बाळगा. कारण तुम्ही मुलांना त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक खाण्याची सवय लावली की, त्यांना आवरणे कठीण असते आणि त्यांच्या लठ्ठपणाला नियंत्रित ठेवणे फारच कठीण होऊन बसते.

# घरच्या घरी करा 'फेस क्लिनअप'



**फेसपॅक**

सध्या तापमान वाढीला सुरुवात झाली आहे. त्यामुळे अनेकदा अशा वातावरणामुळे थकवा जाणवण्यास सुरुवात होते. मात्र, असे असले तरी आपला चेहरा फ्रेश आणि स्वच्छ असल्यास समोरच्याला आणि आपल्यालाही छान वाटते. बऱ्याचदा साबणाने किंवा फेस वॉशने चेहरा स्वच्छ केला जातो. मात्र, आज आम्ही तुम्हाला काही टीप्स सांगणार आहे. त्यांने तुमचा चेहरा स्वच्छ आणि सुंदर देखील दिसण्यास मदत होईल.

- चेहरा धुण्यासाठी तुमच्या त्वचेनुसार योग्य फेस वॉश किंवा क्लिंजर वापरा. त्यानंतर टोनर लावा आणि चेहरा शक्यतो कोमट पाण्याने धुवा.
- चेहऱ्यावरील सुक्ष्म छिद्र बुजवण्यासाठी क्लिंजिंग मिल्क कापसाच्या बोळ्यावर घेऊन चेहरा साफ करुन घ्या.
- नंतर चेहऱ्याला सोसवेल इतकी वाफ घ्या.
- चेहऱ्याला वाफ दिल्यानंतर थंड करण्यासाठी बर्फाने मसाज करा. हा मसाज गोलाकार दिशेने करा.
- तुमच्या त्वचेनुसार योग्य फेस स्क्रबर निवडा. फेस स्क्रबरने ८-१० मिनिटे चेहरा साफ करा.
- स्क्रबर चेहऱ्यावर थोडा सुकल्यानंतर चेहऱ्याला मध लावा. मधामुळे ब्रेकआउट्सचे प्रमाण कमी होते आणि त्वचा उजळते.
- नंतर चेहरा स्वच्छ धुऊन आवडीनुसार फेस पॅक लावा. फेस पॅक पूर्ण सुकल्यावर चेहरा धुऊन टाका.
- हळूहळू चेहरा सुकू द्या. त्यानंतर टोनर लावा. चेहऱ्याला तजेला येण्यासाठी मॉइश्चरायजर लावा आणि मग तुमचा चेहरा पहा अगदी गोरा

# सतत नेलपेंट लावल्यामुळे नखांना होऊ शकतात हे त्रास



काही जणांना कायमच टिप टॉप राहायला आवडते. त्यांना त्यांच्या सगळ्या गोष्टी परफेक्ट लागतात. म्हणजे नखांचेच घ्या ना.क काहींना त्यांची नखं कायमच स्वच्छ हवी असतात. ती छान दिसावी म्हणून खूप जण नियमितपणे नेलपेंट लावण्याची सवय असते. एक रंग लावून झाला की, तो काढून दुसरा रंग किंवा वेगवेगळ्या बोटांना वेगवेगळा रंग असे नेलपेंटसोबत सतत प्रयोग करण्याची खूप जणांना सवय असते. तुम्हीही सतत नखांना नेलपेंट लावत असाल तर तुमच्या नखांचे आयुष्य कमी होण्याची शक्यता असते. सतत नेलपेंट लावणे तुमच्या नखांना काय त्रास देते हे आता आपण जाणून घेऊया.

**नखांवरील इनॅमल करते कमी**

तुम्ही तुमची नखं नीट निरखून पाहिली असतील तर तुम्हाला तुमच्या नखांवर एक वेगळीच चमक दिसेल ही नखांवरील चमक असते तुमच्या नखांवरील इनॅमल. तुम्ही नखांना सतत नेलपेंट लावत असाल तर तुमच्या नखांची चमक कमी होत जाते. नखांवरील कमी होत जाणारी चमक तुमची नखं अनाकर्षक करते. त्यामुळे नखांना नेलपेंट लावल्यानंतर ती साधारण आठवडाभर ठेवा. त्यानंतर ती काढा. आठवडाभर तरी तुम्ही नेलपेंट लावू नका.

**नखांचा रंग करते पिवळा**

आपली नखं छान गुलाबी असतात. या नखांचा रंग तुमच्या सतत नेलपेंट लावल्यामुळे बदलू शकतो. तुमची नखं पिवळी दिसू लागतात. नखांवरील इनॅमल कमी होऊन त्यांना पिवळा रंग येतो. हा रंग जात नाही. जो पर्यंत तुमची नख वाढत नाहीत.तुम्हालाही नखांचा रंग पिवळसर वाटत असेल तर तुम्हाला नेलपेंट लावणे थांबवण्याची गरज आहे.

**नख लागतात तुटू**

नखांवर सतत होणाऱ्या केलमकल्सच्या प्रयोगामुळे नख नाजूक होऊन जातात. तुम्ही ॲसिटोनचा उपयोग करुन नखांवरील नेलपेंट काढून जरी टाकली तरी ॲसिटोनमुळेही तुमची नखं नाजूक होतात. अशी नाजूक झालेली नखं तुटू लागतात. तुम्ही जर अजिबात ब्रेक न घेता नेलपेंट लावत असाल तर तुम्हाला असा त्रास होणे अत्यंत स्वाभाविक आहे. त्यामुळे तुम्ही नखांची थोडी काळजी घ्या.

**नख लागतात दुभंगू**

तुम्ही काही जणांची नखं पाहिली असतील तर तुम्ही एक गोष्ट प्रकषार्ने पाहिली असेल ती म्हणजे काही जणांची नखं दुभंगू लागतात. नखं दुभंगणेही आरोग्यासाठी चांगले नाही. नखं दुभंगू लागली की, त्यांची वाढ होत नाही. ती पातळ वाटू लागतात. ती खरखरीत झाल्यामुळे तुम्हाला ती लागण्याची शक्यता जास्त असते.

**आठवडाभर द्या आराम**

नखांनाही आरामाची गरज असते. तुम्ही जर सतत नेलपेंट लावत असाल तर नखांना श्वास घेण्याचीही संधी मिळत नाही. म्हणून एक आठवडा नेलपेंट लावू नका. त्या काळात नखं छान स्वच्छ ठेवा आणि वाढू द्या.

आता तुम्हाला नखांना नेलपेंट लावायची सवय असेल तर ती आताच थांबवा थोडा ब्रेक घ्या आणि मग पुन्हा तुमची नखं नेलपेंट लावून सुंदर बनवा.

# केळी खा आणि मस्त रहा!



केळी हे असे फळ आहे, जे बाराही महिने बाजारात सहजरित्या उपलब्ध असते. त्यामुळे केळ्याचे सेवन करावे. मात्र, आपण खात असलेल्या फळाचे जर फायदे आपल्याला माहिती असतील तर ते आपण न विसरता आणि आवडीने खातो. चला तर जाणून घेऊया केळी खाण्याचे फायदे.

**उर्जा मिळते**

दोन केळी खाल्ल्याने शरीराला पुढील ९० मिनिटांपर्यंत उर्जा मिळते. त्यामुळे जे अधिक कष्ट करतात त्यांनी केळ्याचे सेवन करावे. त्याचा अधिक फायदा होतो.

**तणाव दूर होतो**

आपल्याला तणाव जाणवत असल्यास केळी खावी यामुळे तणाव दूर होण्यास मदत होते.

**रक्तप्रवाह सुरळीत राहतो**

ब्लड प्रेशरचा त्रास असल्यास अथवा तुम्ही लवकर थकत असाल तर केळ्यांचे सेवन करावे. केळ्यात मोठ्या प्रमाणात पोटॅशियम असते. ज्यामुळे शरीरातील रक्तप्रवाह सुरळीत राहतो.

**हाडे मजबूत होतात**

केळी खाल्ल्याने हाडे मजबूत होतात. केळ्यातील प्रोबायोटिक बॅक्टेरिया खाण्यातील कॅल्शियम शोषून घेते. यामुळे हाडे मजबूत होतात.

**चयापचयाची क्रिया सुधारते**

केळ्यांमध्ये पोषक तत्वांचा खजिना असतो. या पोटॅशियम, फॉलिक ॲ्रि, व्हिटामिन ए, बी, बी ६, आर्यन, कॅल्शियम असते. यामुळे चयापचयाची क्रिया सुधारण्यास मदत होते.

# दूध आणि ताक पिताना पाळलेत हे नियम तर पडणार नाही आजारी







आहाराचा आणि आरोग्याचा अगदी घनिष्ठ संबध असतो. आयुवेर्दानुसार निरोगी राहण्यासाठी आहारावर योग्य नियंत्रण असायला हवं. तुम्ही जे आणि जेव्हा खाता त्याचा परिणाम तुमच्या आरोग्यावर होत असतो. जर आजारपण टाळायचं असेल तर काही गोष्टी योग्य वेळीच खाणं गरजेचं आहे. याचे कारण आपलं शरीर पंचतत्वापासुन तयार झालेलं आहे.

जेव्हा तुम्ही एखादा पदार्थ चुकीच्या वेळी खाता तेव्हा त्याचा तुमच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. जसं की, शरीराच्या योग्य पोषणासाठी आहारात दूध, दही अथवा ताक या पदार्थांचा समावेश असणं फार गरजेचं आहे. मात्र हे पदार्थ कोणत्या वेळी खावेत आणि कोणत्या वेळी खाऊ नयेत हे जर माहीत नसेल तर नुकसान होऊ शकतं.

यासाठी जाणून घ्या दूध आणि ताक कधी प्यावं आणि कधी पिऊ नये.

**दूध पिण्याची योग्य वेळ कोणती**

आयुर्वेदामध्ये दूध हे संपूर्ण आहार म्हणून ओळखलं जातं. कारण दूधात व्हिटॅमिन्स, कॅल्शियम, लोह, प्रोटीन्स भरपूरप्रमाणात असतात. दुधात अनेक पोषक घटक असल्यामुळे तान्हा बाळापासून ते अगदी वयोवृद्ध व्यक्तींच्या आहारात दूध असणं गरजेचं आहे. खरंतर दूध तुम्ही दिवसभरात अगदी कधीही पिऊ शकता. सकाळी नाश्ता करण्यापूर्वी एक ग्लास दूध पिल्यास तुम्हाला दिवसभर उत्साही वाटतं. रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध घेतल्यास थकवा कमी जाणवतो आणि शांत झोप लागते. दुपारी भुक लागल्यास तुम्ही दूध पिऊ शकता. मात्र जेवताना कधीच दूध पिऊ नये कारण इतर खाद्यपदार्थांसोबत दूध पिण्याने तुम्हाला अपचनाचा त्रास होऊ शकतो. यासाठी कोणताही आहार घेण्यापूर्वी दोन तास आधी अथवा जेवणानंतर दोन तासांनी तुम्ही दूध घेऊ शकता.

**दही, ताक, ताकाची कढी कधी प्यावी**

आयुर्वेद शास्त्र सांगते की दही नेहमी सुर्यास्त होण्याआधीच खावे म्हणजेच सुर्यास्ताआधी तुम्ही दिवसभरात कधीही दही खाऊ शकता. सकाळी नाश्ता करताना दह्याचा वापर केलेले पदार्थ अथवा दही खाणे नेहमीच फायदेशीर ठरू शकते. शिवाय दुपारी दही खाण्याने तुम्हाला फ्रेश आणि उत्साही वाटू शकते. मात्र रिकाम्या पोटी दही कधीच खाऊ नका कारण त्यामुळे तुम्हाला रक्तदाबाचा त्रास जाणवू शकतो. त्याचप्रमाणे रात्री सुर्यास्तानंतर दही कधीही खाऊ नका.

काही जणांना रात्रीच्या जेवणात दही खाण्याची सवय असते ती फार चुकीची सवय असते म्हणूनच ती वेळीच सोडा. कारण रात्रीचे दही खाण्यामुळे तुम्ही आजारी पडू शकता. दही हा थंड पदार्थ असल्यामुळे तुम्हाला त्यामुळे सर्दी, खोकला अथवा फुफ्फुसांचे विकार होऊ शकतात. रात्री दही खाण्यामुळे तुम्हाला सांधेदुखीचा त्रास देखील होऊ शकतो. थंडीच्या दिवसांमध्ये दही खाण्यामुळे थकवा, अती झोप, आळस या आरोग्य समस्या जाणवतात. याचप्रमाणे दही कधीच गरम करून खाऊ नका. कारण असे दही शरीरासाठी बाधक असते. ताक हा भारतीय आहारातील एक महत्त्वाचा घटक आहे. दही घुसळून त्यात भरपूर पाणी टाकून ताक केले जाते. ज्यामुळे ताक हा पचनास अतिशय हलका पदार्थ आहे. दोन जेवणाच्या मधल्या वेळेत ताक पिण्यामुळे तुम्हाला उत्साही आणि तरतरीत वाटते. जेवणासोबत ताक पिण्यामुळे तुम्ही खाल्लेले अन्न व्यवस्थित पचते. दिवसभरात तुम्ही कधीही ताक पिऊ शकता. मात्र थंडीच्या दिवसात आणि थंड प्रदेशात सुर्योदयानंतर दह्याप्रमाणेच ताकाचे सेवन करू नये. रात्रीच्या वेळी ताकाला फोडणी देऊन अथवा त्याची कढी करून ते पिण्यास काहीच हरकत नाही. सकाळी रिकाम्या पोटी ताक पिल्यास तुमच्या पोटाच्या समस्या कमी होण्यास मदत होऊ शकते.

त्यामुळे यापुढे दूध, दही, ताक, ताकाची कढी पिताना या गोष्टी जरूर लक्षात ठेवा.

# त्वचेसाठी वरदान आहे कडुनिंब



**कडुनिंब**

कडुनिंबाला आयुवेर्दात खूपच मोलाचं स्थान आहे. या झाडाच्या मुळांपासून ते फुलांपर्यंत सगळ्यात औषधी गुणधर्म असल्यानं त्याला वृक्ष औषधालय असंही म्हटलं जातं. विशेष म्हणजे ज्यांना आपल्या त्वचेचं सौंदर्य खुलवायचं असेल त्यांच्यासाठी कडुनिंब म्हणजे वरदान होय.

**रक्त शुद्ध होते**

रक्त शुद्ध करण्यासाठीही कडुनिंबाचा उपयोग होतो. रक्त शुद्ध झाल्यानं त्वचेच्या अनेक समस्या या दूर होतात.

**मुरुम, पुरळ दूर होते**

कडुनिंबाच्या पानात बुरशीनाशक व जंतुनाशक गुण आहेत. त्यामुळे चेहऱ्यावर आलेले मुरुम, पुरळ यामुळे दूर होतात. त्यामुळे सौंदर्यप्रधानांपेक्षा मुरुम दूर करण्यासाठी कडुनिंब हे अधिक फायदेशीर असतं.

**त्वचा रोगावर रामबाण**

कडुनिंब तेलात फॅटी ॲसिड व ई जीवनसत्त्व आहेत त्यामुळे खरुज, नायटा यांसारख्या व्याधी सहज बऱ्या होतात.

**केसांच्या आरोग्यासाठीही उत्तम**

कडुनिंबाच्या पानांची पेस्ट ही केसांसाठी उत्तम कंडिशनर आहे. त्याचप्रमाणे कडुनिंबाची पानं उकळवून त्या पाण्यानं केस धुतल्यास घामामुळे येणारे खाज दूर होते. तसेच कोंड्याची समस्याही निघून जाते.

# काशिमीरातील डाचकुल पाडा परिसरात २ गटांमध्ये वाद

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

काशीमिरा परिसरातील डाचकुल पाडा येथे सोमवारी रात्री दोन गटांमध्ये किरकोळ वाद झाल्यानंतर मंगळवारी सकाळी काही जणांकडून मोठ्या प्रमाणावर तोडफोड करण्यात आली. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ऑटो रिक्षांच्या काचा फोडण्यात आल्या. त्यानंतर सदरील वादात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उडी घेत तात्काळ याप्रकरणी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार काशीगाव पोलीस ठाण्यात ५० ते ६० जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा रोड येथे दोन गटांत हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. यात ५० हून अधिक वाहनांची तोडफोड ही करण्यात आली आहे. यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.काशिमिरा येथील डाचकुलपाडा भागात राहणाऱ्या एका शाळकरी मुलीची एका तरुणाने छेड काढली होती. याबाबत मुलीच्या कुटुंबियांसह स्थानिकांनी काशिगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मात्र, या घटनेचा राग धरून आरोपी तरुणाने मंगळवारी आपल्या सहकर्यांना बोलावून तक्रार नोंदवण्यासाठी आलेल्या स्थानिकांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या घटनेत दोन गटांत तुफान हाणामारी झाली. काहींनी परिसरात उभ्या असलेल्या पन्नासहून अधिक रिक्षांच्या काचा फोडल्या. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि आमदार नरेंद्र मेहता यांनी घटनास्थळाला भेट दिली असून, या भागात अमली पदार्थांचे सेवन व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



**गुंड प्रवृत्तीविरोधात कठोर कारवाई होणार – मंत्री सरनाईक**

मिरा-भाईंदर शहरात झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्ये बरोबरच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटनाही वाढताना दिसत आहेत. शहरात ड्रग्स आणि अमली पदार्थ विक्रीचे प्रकरण वाढत आहे. यामध्ये काही बाहेरील राज्यांतील आणि बांगलादेशी-रोहिंग्या घुसखोरांचा सहभाग असल्याची माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी पोलिसांना परिसरातील भाडेकरूंची काटेकोर तपासणी, तसेच ड्रग्स नेटवर्कचा संपूर्ण फडशा पाडण्याचे आदेश मंत्री सरनाईक यांनी दिले.

### माशाचापाडाला मिळणार पोलीस चौकी

स्थानिक रहिवाशांनी परिसरात पोलीस चौकी नसल्याची तक्रार केली. या तक्रारीवर त्वरित प्रतिसाद देत मंत्री सरनाईक यांनी तातडीने माशाचापाडा परिसरात पोलीस चौकी सुरू करण्याची घोषणा केली. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नागरिकांना सुरक्षित वातावरण देणे ही आपली जबाबदारी आहे. पोलीस चौकी स्थापनेमुळे वस्तीतील गुंडगिरी आणि ड्रग्स व्यवहारांना आळा बसेल, असे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

# दिवाळी सणाला गालबोट!

## मुंबईत २ दिवसांतील दुर्घटनांत दोघांचा मृत्यू, तर २८ जण जखमी



■मुंबई। प्रतिनिधी,

ऐन दिवाळीच्या उत्सवात मुंबईमध्ये विविध दुर्घटना घडल्या. सलग दोन दिवस घडलेल्या घटनांमध्ये दोन जणांचा मृत्यू, तर २८ जण जखमी झाले आहेत. बोरिवली पश्चिमेकडे एका चाळीत लागलेल्या आगीत ३७ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला, तर मालाडमधील अक्सा समुद्रात १३ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली.

गोराई क्रमांक दोन येथील एका चाळीतील एक मजली बांधकामाला बुधवारी ११.३० वाजण्याच्या सुमारास आग लागली. यामध्ये सजावटीचे साहित्य, फर्निचर, कपडे यांसह अन्य वस्तू जळून खाक झाल्या. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. साधारण अडीच तासांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यात त्यांना यश आले. दोन पुरुष पहिल्या मजल्यावरील पायऱ्यांवरून त्वरित उतरल्याने त्यांची सुखरूप सुटका झाली. पूजा पारेख (३७) मात्र बाथरूममध्ये अडकल्या. त्यांना अग्निशमन दलाने बाहेर काढले. त्या ५० टक्के भाजल्या होत्या. धुरामुळे त्यांना श्वसनाचा त्रासही जाणवू लागला. त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

दुसऱ्या एका घटनेत मालाड पश्चिमेला लिंक रोडवरील सात मजली भूमी क्लासिकल इमारतीच्या सहाव्या आणि सातव्या मजल्यावरील पाच घरांत बुधवारी पहाटे ५.१५ वाजता आग लागली. सहाव्या मजल्यावर लागलेली आग सातव्या मजल्यापर्यंत पसरली. या आगीत इलेक्ट्रिक वायर, फर्निचर, कपडे, खाटा, खुर्च्या, टेबल, वातानुकूलित यंत्रणा आदी सामान जळून खाक झाले. या आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला दोन तास लागले. या घटनेत जीव वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या शुभम अगोतरिया (२४) याच्या डाव्या हाताला, तर जाधव नामक अन्य एका व्यक्तीच्या डाव्या पायाला इजा झाली. त्यांना तत्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

### स्वयंपाकघराचा भाग – कोसळून दोन जखमी

चिराबाजारमधील जे. एस. एस. मार्गावरील म्हाडाच्या आत्माराम इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील स्वयंपाकघराचा भाग तळमजल्यावर कोसळला. बुधवारी पहाटे ६.१५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. ठक्करजी गाला (७५) आणि गुणवंती गाला (७१) हे यामध्ये जखमी झाले. त्यांच्यावर भाटिया रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# जोगेश्वरीच्या बिझनेस सेंटरचा वीज, पाणी पुरवठा बंद... बिल्डरला नोटीस देणार

■मुंबई। प्रतिनिधी,

गुरुवारी सकाळी जोगेश्वरी येथील ज्या १३ मजली जेएनएस बिझनेस सेंटरमध्ये आग लागली त्या व्यावसायिक इमारतीला अद्याप ओसी देण्यात आलेली नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यावर कहर आणि धक्कादायक बाब म्हणजे बिल्डरच्या निष्काळजीपणामुळे सदर इमारतीमधील अग्निप्रतिबंधात्मक यंत्रणादेखील आगीच्या प्रसंगी कार्यान्वित नव्हती. त्यामुळे या घटनेची गंभीर दखल मुंबई महापालिका प्रशासनाने आणि अग्निशमन दलाने घेतली आहे. इमारतीमधील वीज, पाणी पुरवठा खंडित करण्यात आला असून संबंधित बिल्डरला नोटीस बजावण्यात येणार आहे.

मुंबईत दिवाळी कालावधीत अनेक ठिकाणी आगीच्या घटना घडल्या. या घटनांमध्येच, जोगेश्वरी (पश्चिम), एस. व्ही. रोड, बेहराम पाडा येथे उभारण्यात आलेल्या तळमजला अधिक १३ मजली जेएनएस बिझनेस सेंटरमध्ये भीषण आग लागल्याची घटना गुरुवारी सकाळी १०.४५ वाजताच्या सुमारास घडली होती. त्यावेळी ९ व्या मजल्यापासून ते वरती १३व्या मजल्यापर्यंत आग पसरली होती. मात्र या इमारतीमध्ये अग्निप्रतिबंधात्मक यंत्रणा असूनही ती आगीच्या घटनेप्रसंगी कार्यान्वित नव्हती. त्यामुळे आग जास्त भडकली आणि पसरली. जर यंत्रणा कार्यान्वित असती तर तिचा योग्य उपयोग करून आगीवर नियंत्रण मिळविणे आणि आग वेळीच विझविणे शक्य झाले असते. त्यामुळे त्या इमारतीत २७ जण अडकले नसते. त्यापैकी १७ जणांना आगीच्या धुराची बाधा झाली नसती. मात्र दुर्दैवाने अग्निप्रतिबंधकात्मक यंत्रणा बंद अवस्थेत असल्याचे अग्निशमन दलाला आढळून आले. त्यामुळे त्याची गंभीर दखल मुंबई महापालिका प्रशासनाने आणि अग्निशमन दलाने घेतली आहे.

सदर इमारतीचा वीज पुरवठा आणि पाणीपुरवठा देखील खंडित करण्यात आला आहे. या इमारतीची उभारणी करणाऱ्या बिल्डरला अग्निशमन दलाकडून लवकरच नोटीस बनवण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या आगीत इमारतीमधील १५ ते २० ऑफिस जाळून खाक झाले. या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. सुदैवाने अग्निशमन दलाच्या जवानांनी वेळीच घटनास्थळी पोहोचून अनेकांची सुखरूप सुटका करुन त्यांचे प्राण वाचविले. मात्र या एकूणच दुर्घटनेत संबंधित बिल्डरचा हलगर्जीपणा, निष्काळजीपणा झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महापालिकेच्या डीपी आणि बीपी खात्याकडून बिल्डरला नोटीस बजावली जाणार आहे. त्याला प्रति चौरस मीटर १०० रुपये दंड आकारण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते.

### संघाच्या कार्यालयावर धडकला 'वंचित'चा मोर्चा

# आरएसएसवर बंदी आणण्याची मागणी



■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,

आरएसएसवर बंदी आणा आणि कार्यकर्त्यांवर केलेले गुन्हे तत्काळ मागे घेण्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आरएसएस कार्यालयावर जन आक्रोश मोचार्ची घोषणा केली होती. त्यानुसार शुक्रवारी क्रांती चौकात आरएसएस विरोधात वंचीत बहुजन आघाडीने मोर्चा काढला. यावेळी कार्यकर्त्यांनी संघाच्या विरोधात घोषणा देत क्रांती चौक दणाणून सोडला. पोलिसांनी मोचार्ला परवानगी नाकारल्यानंतरही संघाच्या भाग्यनगर येथील कार्यालयावर मोर्चा नेण्याचा निर्धार युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केला होता. त्यामुळे सकाळपासूनच क्रांती चौकात पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता.

### परवानगी नाकारली असूनही मोर्चा निघाला

संघावर बंदी घालण्याच्या मागणीसाठी या मोर्चात फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेचे अनेक नेते आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी मोचार्ला परवानगी नाकारली असूनही मोर्चा निघाला. अदालत रोड मार्गे संघाच्या कार्यालयावर पोहचताच पोलिसांनी बॅरिकेट लावून मोर्चा अडवला.

# कूपर रुग्णालयात बसवणार 'फायर सेफ्टी बॉल' आगीपासून होणार संरक्षण

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महापालिकेच्या पश्चिम उपनगरातील कूपर रुग्णालयात आगीपासून बचाव होण्यासाठी 'फायर सेफ्टी बॉल'बसविण्यात येणार आहेत. त्यासाठी टेंडर प्रक्रिया करण्यात आली आहे. अशा प्रकारचे 'फायर सेफ्टी बॉल' छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकासमोरील मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात दुसऱ्या मजल्यावर जेथे अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालय आहेत, त्या ठिकाणी बसविण्यात आले आहेत.

मुंबईत दिवाळीत अनेक ठिकाणी लहान-मोठ्या आगी लागण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामध्ये जीवित हानी देखील झाली आहे. मुंबईत अनेक ठिकाणी आग लागली अग्निशमन दलाची यंत्रणा घटनास्थळी पोहोचेपर्यंत आगीची तीव्रता वाढण्याची शक्यता असते. त्यासाठीच मुंबई महापालिकेने रहिवाशी, व्यावसायिक इमारतींमध्ये, कंपनीत, कारखान्यात, दुकान, मॉल आदी ठिकाणी अग्निप्रतिबंधक यंत्रणा बसविणे बंधनकारक केले आहे.

ही यंत्रणा नसेल तर आग जास्त प्रमाणात भडकते. त्यामुळे मोठी जीवित आणि वित्तीय हानी होते. मात्र सदर यंत्रणा असेल आणि ती कार्यान्वित असेल तर आग ज्यावेळी छोटी असते, तिचे प्रमाण कमी असते त्यावेळीच अग्निप्रतिबंधक यंत्रणा वापरून तिच्यावर नियंत्रण मिळविणे शक्य असते. मात्र आगीचे प्रमाण जास्त असेल तर अशावेळी अग्निशमन दलाची यंत्रणाच घटनास्थळी आवश्यक असते. त्यामुळे आगीचे निरीक्षण करून आग विझविण्यासाठी योग्य ते नियोजन करून तत्काळ आगीवर ताबा मिळविणे सोपे जाते. त्यामुळे आग लवकर विझविण्यास मदत होते. परिणामी जीवित आणि वित्तीय हानी टाळणे शक्य होते.



मुंबई अग्निशमन दलाच्या प्रमुख अधिकारी पदावर त्यावेळी प्रभात रहांगदळे असताना त्यांच्या संकल्पनेतून हे ह्यफायर सेफ्टी बॉलह्ण बसविण्यात आले असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आता मुंबई महापालिकेच्या कूपर रुग्णालयात देखील असे ह्यफायर सेफ्टी बॉलह्ण बसविण्यात येणार आहेत. कारण की, कूपर रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण उपचारासाठी येत जात असतात. उद्या रुग्णालयात आग लागल्यास मोठ्या अग्निप्रतिबंधक यंत्रणेचा वापर तर केला जाईलच, मात्र तोपर्यंत या ह्यफायर सेफ्टी बॉलह्णचा देखील वापर आग विझविण्यासाठी विशेषतः ज्या ठिकाणी मनुष्य किंवा कर्मचारी नसतील अशा ठिकाणी आग लागल्यास ठराविक तापमानाप्रसंगी हा ह्यफायर सेफ्टी बॉलह्णआपोआप फुटतो.

आग लागली तर फायरएग्स्टिनेशरचा वापर तत्काळ केल्यास आग विझविण्यास मोठी मदत होते. तसेच, मंत्रालय, महापालिका कार्यालय आदी ठिकाणी मनुष्य उपस्थित नसताना आग लागल्यास स्प्रिंकलरचाही वापर होतो. इमारतीमधील पाण्याच्या टाकीतील पाण्याचा अथवा अग्निशमन दलाच्या वॉटर टँकरमधील पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे आग विझविण्यास मदत होते.

सरकारी, निमसरकारी कार्यालयाच्या ठिकाणी कार्यालये सुटीमुळे बंद असताना म्हणजेच कोणीही मनुष्य, कर्मचारी उपस्थित नसताना आग लागल्यास जेथे आग लागलेली असेल त्याच परिसरात 'फायर सेफ्टी बॉल' बसवलेले असल्यास त्या आगीच्या ठराविक तापमान वाढीमुळे 'फायर सेफ्टी बॉल'चा स्फोट होतो आणि त्या बॉलमधील आग विझविण्यासाठी त्या बॉलमध्ये अगोदरच भरून ठेवण्यात आलेली केमिकल पावडर सर्वत्र उधळते आणि त्यामुळे आगीवर नियंत्रण येण्यास मदत होते. मात्र सध्या या 'फायर सेफ्टी बॉल' चा वापर जास्त कुठे होताना दिसत नाही. परंतु मुंबई महापालिका मुख्यालयात काही कालावधीपूर्वी 'फायर सेफ्टी बॉल' बसविण्यात आले आहेत.

विशेषतः महापालिकेच्या सहामजली नवीन इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावर ज्या ठिकाणी अतिरिक्त आयुक्त यांची कार्यालये आहेत. चार अतिरिक्त आयुक्त त्या कार्यालयात आपल्या अधिकाऱ्यांसोबत बसून प्रशासकीय कामे करतात. त्या ठिकाणी अतिरिक्त आयुक्त कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळच 'फायर सेफ्टी बॉल' बसविण्यात आले आहेत. मात्र आजपर्यंत त्याचा वापर करण्यात आलेला नाही.

'फायर सेफ्टी बॉल'चा स्फोट होतो आणि त्यातील केमिकल पावडर आगीवर पसरून आग विझविण्यास मदत होते. तसेच, प्राथमिक स्तरावर आग लागल्यावर जशी ती आग मोठी होत जाईल आणि तोपर्यंत अग्निशमन यंत्रणा प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचली नसेल, तर त्या प्रसंगी कोणीही प्रशिक्षित व्यक्ती ज्याने 'फायर सेफ्टी बॉल' हाताळून तो आगीच्या दिशेने टाकल्यास ठराविक तापमानात तो आपोआप फुटेल आणि आगीवर केमिकल पावडर पसरून आग विझविण्यास मदत होऊ शकते. मात्र त्यासाठी तो ह्यफायर सेफ्टी बॉलह्ण प्रमाणित कंपनीचा असणे महत्त्वाचे असते.

# गर्भवती असल्याचे भासवत ४९ हजारांची फसवणूक

■मुंबई। प्रतिनिधी,

गेल्या काही काळापासून सायबर गुन्हेगारीच्या प्रकरणात वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. अशामध्ये दुसऱ्यांची फसवणूक करण्यासाठी वेगवेगळ्या युक्त्या त्यांच्याकडून वापरल्या जातात. नुकतेच समोर आलेल्या माहितीनुसार, गोवंडी येथील एका महिलेची अशीच फसवणूक करण्यात आली आहे. पीडित महिलेला आणि तिच्या पतीला गर्भवती असल्याचे तब्बल ४९ हजार गुगल पेद्वारे लंपास केल्याचे समोर आले आहे. आपली फसवणूक झाली आहे. टेलर असलेला ३४ वर्षीय व्यक्तीने दाखल केलेल्या माहितीनुसार, त्याचे गोवंडीमधील एका सरकारी बँकेमध्ये बचत खाते आहे. त्याचा मोबाईल नंबर आणि गुगल पे हे दोन्ही या संबधित खात्याशी जोडलेले आहे. त्याने सांगितलेल्या माहितीनुसार, १४ ऑक्टोबर रोजी अंदाजे दुपारी १.३० वाजता त्याच्या कामात व्यस्त होता. त्याच्या पत्नीने त्याला सांगितले की, एका गरोदर असलेल्या महिलेने फोन केला. यावेळी त्या महिलेने टेलरच्या खात्यावर पैसे पाठवणार असून त्याचा गुगल पे नंबर देण्यास सांगितले. पत्नीने असेही सांगितले की ती महिला तेव्हाही फोनवर होती. टेलरच्या सांगण्यानुसार, तो त्याच्या पत्नीशी बोलत असताना कॉल डिस्कनेक्ट झाला. थोड्या वेळाने टेलरला एका अनोळखी महिलेचा फोन आला. यावेळी त्या महिलेने टेलरला सांगितले की, तुमच्या पत्नीच्या प्रसूतीसाठी आशा अंगणवाडीमार्फत काही मदत केली जाणार आहे. त्यासाठी तुम्हाला लगेच गुगल पेचे अ‍ॅप उघडावे लागेल. टेलरने लगेचच गुगल अ‍ॅप उघडले. त्यावर तेव्हा १२,६०० रुपयांची एक रिक्वेस्ट आली होती. त्याने त्यावर क्लिक केल्यानंतर त्याच्या खात्यातून १२,६०० कापले गेले. यावरून त्याने लगेच संबधित महिलेले पैसे कापले गेल्याचे सांगितले. तेव्हा त्या महिलेने समोरून सांगितले की, तुमची रिक्वेस्ट आपोआप रद्द झाली आहे. विशेष म्हणजे त्यानंतरही त्याला १२,६०० रुपये, १२,२०० रुपये आणि १२,२०० रुपये अशा धडधड रिक्वेस्ट आल्या आणि त्या महिलेचा फोन डिस्कनेक्ट झाला. त्या महिलेला टेलर पुन्हा एकदा फोन लावण्याचा प्रयत्न केला पण तीचा फोन बंद येत होता. यावेळी टेलरच्या लक्षात आले की, त्याच्या खात्यातून चार तुकड्यांमध्ये 49,600 रुपये काढले गेले आहेत. ही बाब लक्षात येताच टेलरने राष्ट्रीय सायबर सुरक्षा पोर्टलवर तक्रार दाखल केली. पण, त्यानंतर तो काही तातडीच्या कामासाठी बाहेर गेल्याने गुरुवारी (२३ ऑक्टोबर) गोवंडी पोलिसात एफआयआर दाखल केला.

### दाऊदच्या ड्रग्ज पुरवठादाराला ३ दिवसांपूर्वी अटक

# मुंबई विमानतळावर येणारे ड्रग्ज नेटवर्क थेट या देशातून चालवले

■मुंबई। प्रतिनिधी,

विमानतळाचा वापर करून थायलंडमधून भारतात हायब्रिड गांजाची तस्करी करणाऱ्या एका मोठ्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज सिंडिकेटचा पदार्फाश करण्यात आला आहे. हे नेटवर्क ड्रग्ज किंगपिन जमजीथ के.पी. उर्फ समझू याच्या नेतृत्त्वात सुरु होते. समझू काही काळापूर्वी थायलंडहून दुबईला पळून गेला होता. या प्रकरणात आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी तिघांना ९ जुलै २०२३ रोजी अटक करण्यात आली होती आणि त्यांच्याकडून ४ किलो १३३ ग्रॅम हायब्रिड गांजा जप्त करण्यात आला होता. चौकशीदरम्यान समझूचे नाव समोर येताच, त्याच्याविरुद्ध लूकआउट नोटीस जारी करण्यात आली.

### ड्रग्ज नेटवर्क थायलंडमधून कार्यरत

२१ ऑक्टोबर रोजी दुबईहून परतल्यानंतर मंगळुरू विमानतळावर समझूला अटक करण्यात आली. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, समझू प्रामुख्याने मालवाहतुकीद्वारे भारतात ड्रग्ज आयात करत असे. थायलंडहून त्याच्या माणसांनी पाठवलेले पार्सल प्रथम मुंबई विमानतळावर, नंतर दिल्ली विमानतळावर पोहोचायचे. कधीकधी, दोन्ही विमानतळांवर एकाच वेळी डिलिव्हरी होत असे. त्यानंतर हे कन्साइनमेंट विविध राज्यांमधील वितरण केंद्रांवर पाठवले जायचे. तपासात असे आढळून आले की, केरळमधील कोझिकोड (कालिकत) येथील रहिवासी असलेला समझू गेल्या



काही वर्षांपासून थायलंडमध्ये राहत होता. त्याने यापूर्वी कंबोडियामध्ये नऊ वर्षे तंबाखूच्या व्यवसायाचे काम केले होते. पण नंतर तो ड्रग्ज तस्करीकडे वळला. त्याने तरुण भारतीय पुरुषांना त्याच्या नेटवर्कमध्ये आकर्षित केले आणि हायब्रिड गांजासाठी पुरवठा साखळी स्थापन केली.

तो रोख रक्कम मिळवणे, पोहोचवणे आणि रोख व्यवहारांच्या संपूर्ण प्रणाली साखळीवर वैयक्तिकरित्या लक्ष ठेवत असे. तो सध्या दिल्ली पोलिसांच्या ताब्यात आहे आणि मुंबईच्या अंमली पदार्थ विरोधी तपास संस्थांकडून त्याची पुढील चौकशी केली जाईल. विशेष म्हणजे, २१ ऑक्टोबर रोजी दुबईहून मंगळुरूला परतताना समजूला अटक करण्यात आली होती, तर दुसऱ्याच दिवशी, म्हणजे २२ ऑक्टोबर रोजी, दाऊद इब्राहिमच्या ड्रग्ज नेटवर्कशी संबंधित सलीम शेखलाही दुबईहून हद्दपार केल्यानंतर मुंबई विमानतळावर अटक करण्यात आली. दोन दिवसांत परदेशातून आलेल्या दोन ड्रग्ज माफियांना झालेली ही अटक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. मार्च २०२४ मध्ये सांगली येथून जप्त केलेल्या २५६ कोटी रुपयांच्या एमडी ड्रग्ज प्रकरणात सलीम शेखचा संबंध असल्याचे पूर्वी मानले जात होते. परंतु आता तपासात असे दिसून आले आहे की काही महिन्यांपूर्वी तेलंगणातील विकाराबाद आणि उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे जप्त केलेल्या ३२७ कोटी रुपयांच्या एमडी ड्रग्जच्या पुरवठ्याशीही त्याचे संबंध आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com